समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
जा. क्र. सविवि/ ५१५
दिनांक - ०१/०७/२०२१

**मा. सर्व खाते प्रमुख**
**मा. उप आयुक्त** (परिमंडळ १ ते ५ )
**मा. महापालिका सहाय्यक आयुक्त**
(क्षेत्रिय कार्यालय १ ते १५)
पुणे महानगरपालिका

**विषय :– पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांना/क्षेत्रिय कार्यालयांकरीता आवश्यक सेवा पुरविणेसाठी बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना र. रू. ३ लाखांपर्यंतची कामे विना निविदा देणेबाबत.**

संदर्भ :– १. अति. महापालिका आयुक्त (वि.) कार्यालय, पुणे महानगरपालिका जा.क्र. अतिमआवि/सविवि/४०४० दि.१८/३/२०२० रोजीचे पत्र.
२. महाराष्ट्र शासन, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रास्ता पेठ, पुणे यांचेकडील जा.क्र.३१/आस्था/से.सो/१४२३/२०२१ दि.२२/०६/२०२१ रोजीचे पत्र.

मा. अति. महापालिका आयुक्त (वि.), पुणे महानगरपालिका संदर्भ क्र. १ चे पत्रान्वये 'पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांना/क्षेत्रिय कार्यालयांकरीता आवश्यक सेवा पुरविणेसाठी बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना र. रू. ३ लाखांपर्यंतची कामे विना निविदा देते वेळेस मा. महापालिका आयुक्त ठराव क्र.६/७२० दि.०४/०१/२०२० नुसार व महाराष्ट्र शासन, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रास्ता पेठ, पुणे यांचेकडील क्र.३१/आस्था/सेसो/४६८६/२०१९ दि.९/१२/२०१९ रोजीच्या सोबत जोडलेल्या पत्रातील मार्गदर्शनानुसार व मार्गदर्शन पत्रातील संदर्भ क्र. २ व ३ च्या अनुषंगाने कार्यवाही करावी, असे आदेश प्रसुत केले आहे.

मा. सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, पुणे यांनी संदर्भ क्र. २ अन्वये 'आपल्या विभागाकडे असलेली रूपये तीन लाखापर्यंतची कामे तात्काळ या कार्यालयाकडे पाठविण्यात यावी म्हणजे काम वाटप समितीने मान्यता दिलेल्या स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थांची शिफारस करणे या कार्यालयास शक्य होईल व तद्नंतर आपल्या विभागाच्या कार्यप्रणालीनुसार संबंधित संस्थांना कार्यादेश देण्याबाबत कार्यवाही करणे उचित ठरेल. तरी आपणाकडे उपलब्ध असलेली रूपये ३ लाखापर्यंतची कामे तत्काळ या कार्यालयाकडील पाठविण्यात यावी, असे कळविले आहे.

तरी आपल्या विभागाकडे उपलब्ध असलेली रूपये ३ लाखापर्यंतची कामे महाराष्ट्र शासन, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रास्ता पेठ, पुणे या कार्यालयाकडे पाठविण्यात यावी

मा. कळावे.

(रंजना गगे)
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

**प्रत कृपया अवलोकनार्थ व माहितीसाठी –**
१) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
२) मा. अति. महापालिका आयुक्त (इ.), पुणे महानगरपालिका

D:\New UCD 3\Gholap\3 lakh kamanbabat.doc

महाराष्ट्र शासन
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
४८१, रास्तापेठ, पुणे,
दुरध्वनी २६१३३६०६
ई मेल punerojgar@gmail.com वेबसाईट www.rojgar.mahaswyam.gov.in

जा.क्र.३१/आस्था/से.सो/१४२३/२०२१

दिनांक :२२/०६/२०२१

प्रति,
मा.उपआयुक्त,
समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका,
पुणे.

विषय : **पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांना/क्षेत्रीय कार्यालयाकरीता आवश्यक सेवा पुरविणेसाठी बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना रुपये ३ लाखापर्यंतची कामे विना निविदा देणेबाबत**

संदर्भ : १)आपले पत्र क्र. सविवि/३६२ दिनांक ११/०६/२०२१.
२)महाराष्ट्र शासन, रोजगार व स्वयंरोजगार विभाग शासन निर्णय क्रमांक इएसई-२००३/प्र.क्र.१९१/रोस्वरो-१, दिनांक १ फेब्रुवारी २००६.
३)महाराष्ट्र शासन कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्र. कौविउवि-२०१५/प्र.क्र.९७/रोस्वरो-१ दिनांक ११ डिसेंबर २०१५.
४)या कार्यालयाचे पत्र क्र.३१/आस्था/सेसो/४६८६/२०१९ दिनांक ०९/१२/२०१९.

महोदया,

उपरोक्त विषयांकित संदर्भ क्र.१ अन्वये आपण बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थाना कामे देण्याबाबत संस्थांची नोंदणी करून घेणेस विनंती केलेली आहे. तसेच आपण काही संस्थांची नावेही दिलेली आहेत.

याबाबत आपणास संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना रूपये ३ लाखापर्यंतची कामे विना निविदा देण्याबाबत संदर्भ क्र. २ व ३ मधील शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेले असून काम वाटप समितीही निश्चित करण्यात आलेली आहे.

सदरहू काम वाटप समितीची कार्यपध्दती आपणास या कार्यालयाच्या संदर्भ क्रमांक ४ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे

तरी आपल्या विभागाकडे असलेली रूपये तीन लाखापर्यंतची कामे तात्काळ या कार्यालयाकडे पाठविण्यात यावी म्हणजे काम वाटप समितीने मान्यता दिलेल्या स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थांची शिफारस करणे या कार्यालयास शक्य होईल व तद्नंतर आपल्या विभागाच्या कार्यप्रणालीनुसार संबंधित संस्थांना कार्यादेश देण्याबाबत कार्यवाही करणे उचित ठरेल.

तरी आपणाकडे उपलब्ध असलेली रूपये ३ लाखापर्यंतची कामे तात्काळ या कार्यालयाकडे पाठविण्यात यावी ही विनंती.

आपली,
२२/६
(अ.उ.पवार)
सहाय्यक आयुक्त,
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता,
पुणे.

उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
आवक क्रमांक: ८०४
दिनांक: २३/६/२०२१